**कर्नाटक येथे महिलेचा अमानुष खुन करुन फ़रारी झालेल्या चार आरोपींना वानवडी पोलींसानी शिताफीने पकडुन कर्नाटक पोलींसाच्या हवाली केले.**

गांधीचौक पोलीस स्टेशन जि.विजापुर रा.कर्नाटक येथिल गु.रं.नं ११७/२०१९ भा.द.वि.कलम ३०२,१४९,४९८(अ),३०४(ब),या गुन्ह्यातील मयत महिला नामे परविन आश्पाक कालेकोटे वय-२६ वर्षे रा.वबलेश्वर नाका विजयपुर कर्नाटक हिचा हुंड्याचे कारणावरुन तिचा पती नामे अश्पाक फकरुद्दीन कालेकोटे वय-४६ वर्षे,रा.सदर याने त्याचे वडिल फकरुद्दीन कालेकोट ,आई रहमत बि कालेकोटे,बहिन आसमा कालेकोटे व भाऊ अलताफ व इतर दोन यांनी परविन हिचा दिनांक ०८/०६/२०१९ रोजी सकाळी ०७/०० ते १०/०० वा.दरम्यान तिचे गुप्तांग भागामध्ये लोखंडी सळई घालुन व तिचा गळा आवळुन तिचा अमानुष खुन केला.तिचा पती आश्पाक याला कार्नाटक पोलींसानी अटक केली असुन बाकी आरोपी फरार झाले.परविन ही आश्पाक याची तिसरी पत्नी आहे.सदर आमानुष केलेल्या कृत्यामुळे गुन्हा घडले ठिकाणी व कर्नाटक मध्ये इतरत्र लोंकानी स्वयं स्फुर्तीने मोर्चे काढुन निषेध नोंदवण्याचे काम चालु आहे.काही ठिकाणी मोर्चाला हिंसक वळण लागले आहे.कर्नाटक पोलीसांवर जनतेने व इतर संघटनांनी आरोपी अटक करणे विषय प्रंचड प्रमाणात दबाव आनल्याने पोलींसानी फरारी आरोपींना पकडणेसाठी जंगजग पछाडले पंरतु आरोपीचा काहीएक सुगांवा लागला नाही.कर्नाटक पोलींसाच्या तपासामध्ये आरोपीचे नातेवाईक सय्यदनगर,पुणे या ठिकाणी राहत असल्याचे समजल्याने कर्नाटक पोलीस हे वानवडी पोलीस स्टेशन ,पुणे येथे मदत मागण्यासाठी आल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.क्रांतीकुमार पाटील यांनी गुन्ह्याचे गांभिर्य लक्षात घेवुन कर्नाटक पोलींसाच्या सोंबत वानवडी पोलीस स्टेशन कडील पोलीस कर्मचारी.प्रतिक लाहिगुडे,शिरीष गोसावी, यांना सय्यदनगर येथे आरोपीचे नातेवाईकांचा शोध घेणेकामी पाठवील असता महंमदवाडी चौकीतील कर्मचारी नितेश पुंडे,सुदर्शन म्हांगरे,आजिक्य नानगुडे, यांचे मदतीने शोध घेतला असता सय्यदनगर गल्ली नं २७ मध्ये आरोपी नामे अलताफ हा त्याचे सासरवाडीत यांचेकडे मिळुन आला.त्याला ताब्यात घेवुन पोलींसानी त्याच्याकडे विचार पुस करीता तो उडवा उडवीची व असंबध उत्तर देवु लागल्याने पोलींसानी त्यास वानवडी पोलीस स्टेशन येथे आनुन त्याला वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.क्रांतीकुमार पाटील यांचेसमोर आनुन हजर केले,श्री.पाटील यांनी त्याला विश्वासात घेवुन इतर आरोपींची राहण्याचे ठावठिकाणा विषयी विचारणा केली असता त्याने त्यांची काही एक माहिती दिली नाही. पाटील यांनी त्याला पोलीसी खाक्या दाखवल्यावर तो पोपटासारखा बोलु लागला.त्याने इतर आरोपी हे रामटेकडी भागात असल्याचे सागितले.पो.नि पाटील यांनी लागलीच सहा.पोलीस फौजदार बाबासाहेब करचे,प्रतिक लाहिगुडे,व शिरीष गोसावी, सुधिर सोनवणे,नासिर देशमुख, सागर नवले तसेच कर्नाटक पोलींस महिला एएसआय कुचबाळ,मपोशि दिपा रजपुत,पोशि सुरेश आडके,पोशि व्हिएन शापुर यांना रामटेकडी भागात आरोपीचा शोध घेणे कामी पाठवले असता सदरचे आरोपींबाबत नातेवाईकांकडे शेजारी पाजारी लोकांकडे विचारपुस केली असता आरोपी अत्ताच थोड्यावेळा पुर्वी अलताफ याला ताब्यात घेतल्यानंतर पळुन गेल्याचे समजले.पोलींसानी सखोल चौकशी केली असता सदर आरोपी हे कोढंवा कौसरबाग परिसरात गेल्याचे **पोशि प्रतिक लाहिगुडे,पोशि शिरीष गोसावी यांना बातमीदारा मार्फत समजले**.पोलीसांनी लागलीच पो.नि पाटील यांनी दिलेल्या सुचना प्रमाणे आरोपींचा कौसरबाग कोंढवा येथे जावुन शोध घेतला असता सदर आरोपी हे कौसरबाग मस्जीद जवळील हॉटेल जवळ येणार असल्याचे समजल्याने पोलींसानी सदर ठिकाणी साधेवेशात सापळा लावला. आरोपी येताच त्यांना लागलीच सापळा रचून पकडले त्यामध्ये आरोपी फकरुद्दीन कालेकोट ,रहमत बि कालेकोटे, आसमा कालेकोटे असे मिळाल्याने त्यांना वानवडी पोलीस स्टेशन येथे आनुन स्टेशनडायरी नोंद करुन कर्नाटक पोलीसांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.कर्नाटक पोलींस आरोपींना ताब्यात घेवुन कर्नाटक कडे रवाना झाले आहेत.

सदरची कामगिरी वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.क्रांतीकुमार पाटील,पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री.सलीम चाऊस याचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस फौजदार बाबासाहेब करचे,पोशि प्रतिक लाहिगुडे,शिरीष गोसावी,नितेश पुंडे,सुदर्शन म्हांगरे,अजिक्य नानगुडे,सुधिर सोनवणे,नासिर देशमुख,सागर नवले,यांनी केली आहे.

